मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

दूरध्वनी क्र. ०२२ २२८३ ०६२६
मेल आयडी- desk१.mdd-mh@gov.in
संकेतस्थळ : mdd.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्यांक विकास विभाग**
दालन क्र. ५२८, मंत्रालय (विस्तार इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
४०० ०३२

स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके ३५०

क्रमांक : अविवि-२०२६/प्र.क्र.६५/का-१ दिनांक : २३ मार्च, २०२६

प्रति,

सह / उप सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय :- अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)" या स्वतंत्र स्वायत्त संस्थेच्या आस्थापनेवरील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ :- (१) अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-अविवि-६५२४/ प्र.क्र.१८/का-१, दिनांक २२.८.२०२४,
(२) अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-अविवि-६५२४/ प्र.क्र.१८/का-१, दिनांक १३.१.२०२६.

राज्यातील अल्पसंख्यांक समुदायांच्या, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाशी संबंधित समस्यांचा अभ्यास करणे आणि शासनास त्यावरील उपाययोजना सुचवून त्याअनुषंगाने आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे, याकरिता बार्टी, सारथी, महाज्योती यासारख्या संस्थांच्या धर्तीवर अल्पसंख्यांक समुदायासाठी या विभागाच्या अधिपत्याखाली दिनांक २२.८.२०२४ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आले आहे. सदर संस्थेचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आहे. अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (MRTI) दिनांक १६.१०.२०२५ च्या आदेशान्वये स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यात आले आहे. तसेच खालील प्रमाणे ११ पदे निर्माण करण्यात आली आहेत :-

| अ.क्र. | पदनाम व संवर्ग | सुधारित वेतन मॅट्रिक्स मधील वेतनस्तर | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | संचालक | एस-२५ : ७८८००-२०९२०० | ०१ |
| २ | प्राध्यापक | एस-२३ : ६७७००-२०८७०० | ०१ |
| ३ | प्रकल्प अधिकारी (श्रेणी-२) | एस-२० : ५६१००-१७७५०० | ०१ |
| ४ | सहायक प्राध्यापक | एस-१८ : ४९१००-१४२४०० | ०१ |
| ५ | उच्चश्रेणी लघुलेखक | एस-१६ : ४४९००-१४२४०० | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | सहायक संशोधन अधिकारी | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ०१ |
| ७ | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५५००-८११०० | ०१ |
| ८ | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | ०१ |
| ९ | वाहन चालक | बाह्ययंत्रणेद्वारे / कंत्राटी तत्त्वावर | ०१ |
| १० | शिपाई | बाह्ययंत्रणेद्वारे / कंत्राटी तत्त्वावर | ०२ |
| | | एकूण : | ११ |

२. अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थे (MRTI) करिता निर्माण करण्यात आलेल्या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करुन नियमित स्वरुपात पद भरतीला काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अल्पसंख्यांक समुदायांना लाभ देण्याकरिता सद्य:स्थितीत सदर पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबतचा निर्णय दिनांक १३.१.२०२६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

३. सबब, परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेली ११ पदांपैकी अनुक्रमांक-१ ते ८ मधील पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची असल्याने, आपल्या आस्थापनेवरील अधीनस्त कार्यालयातील समकक्ष वेतन मॅट्रिक्समधील अधिकाऱ्यांची सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात यावी, ही विनंती.

( जहांगीर खान )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन